RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक–मध्य उप–विभाग

वर्ष १२, अंक २७] गुरुवार ते बुधवार, जुलै २-८, २०२६/आषाढ ११-१७, शके १९४८ [पृष्ठे १४, किंमत : रुपये १६.००

### प्राधिकृत प्रकाशन

**शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी**

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २६ मे २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक डीजीपी-२४१५/प्र.क्र. ३७५ /का.१४.—ॲड. विवेक हरिभाऊ शुक्ला यांची शासन अधिसूचना क्रमांक डीजीपी-२४१५/प्र.क्र.३७५/का.१४, दिनांक ३ सप्टेंबर २०१६ अन्वये जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर येथील " जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता " या पदावर केलेल्या नियुक्तीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, दिनांक १५ मार्च २०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये ॲड. शुक्ला यांना सदर पदावर त्यांच्या वयाच्या ६२ वर्षानंतर २ वर्ष किंवा पुढील आदेशापर्यंत यापैकी अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढ ॲड. शुक्ला यांना वयाची ६४ वर्षे पूर्ण झाल्याने दिनांक ४ मे २०२६ रोजी संपुष्टात आली आहे.

२. आता, शासन निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम, १९८४ च्या नियम १३ व ३० (२) परंतुक व त्यामधील दिनांक २३ जानेवारी २००८ रोजीच्या सुधारणेनुसार ॲड. विवेक हरिभाऊ शुक्ला यांच्या जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर या पदावरील नियुक्तीस देण्यात आलेली मुदतवाढ त्यांच्या वयाच्या ६४ वर्षानंतर १ वर्षे किंवा पुढील आदेशापर्यंत यापैकी अगोदर घडेल त्या कालावधीकरिता पुढे सुरू ठेवण्यात येत आहे.

३. सदर नियुक्ती महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम, १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तींच्या अधीन राहील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरुस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश स. मांजरेकर,**
कार्यासन अधिकारी.

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २५ मे २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एजीपी-२०२६/प्र.क्र.७३/का.१४.—ॲड. स्नेहल कालीदास नाईक यांची शासन अधिसूचना क्रमांक जीपीए- ३११६/११७/प्र.क्र.९९/का.१४, दिनांक २१ ऑक्टोबर २०१५ अन्वये पुणे जिल्ह्याकरिता "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" या पदावर केलेल्या नियुक्तीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, ॲड. स्नेहल कालीदास नाईक यांना दिनांक १७ मे २०२६ रोजी वयाची ६२ वर्ष पूर्ण झाली आहेत.

२. आता शासन निर्देशानुसार तसेच महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम, १९८४ च्या नियम १३ व ३० (२) परंतुक व त्यामधील दिनांक २३ जानेवारी २००८ रोजीच्या सुधारणेनुसार ॲड. स्नेहल कालीदास नाईक यांच्या सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, पुणे जिल्ह्याकरिता देण्यात आलेल्या नियुक्तीस त्यांच्या वयाच्या ६२ वर्षानंतर १ वर्षे किंवा पुढील आदेशापर्यंत यापैकी अगोदर घडेल त्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर मुदतवाढ महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती व मानधन) नियम १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरुस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश स. मांजरेकर,**
कार्यासन अधिकारी.

---

## विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २६ मे २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एजीपी-२०२६/प्र.क्र. ४५/का.१४.—विधि व न्याय विभाग शासन अधिसूचना क्रमांक जीपीएच-२०२३/प्र.क्र.२२५/का.१४, दिनांक ०७ मार्च २०२४ अन्वये ॲड. खान अफताब अहमद अनिस यांची मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे "सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता" या पदावर पुढील दोन वर्षाचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर शासन निर्देशानुसार ॲड. खान यांची सदर पदावरील नियुक्ती दिनांक ०१.०४.२०२६ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये दिनांक ०६ मार्च २०२६ पासून संपुष्टात आणण्यात आली आहे.

२. आता, शासन निर्देशानुसार ॲड. खान अफताब अहमद अनिस यांच्या " सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ", मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद या पदावरील नियुक्तीस दिनांक ०७ मार्च २०२६ पासून पुढील एक वर्षाचा कालावधी अथवा त्यांच्या वयास ६२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर मुदतवाढ महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवाशर्ती व मानधन) नियम १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

४. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरूस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. कुँवरसिंह राजबहादूरसिंह सिंघेल,**
शासनाचे उप विधि सल्लागार-नि-उप सचिव.

## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

### आदेश

क्रमांक ना. बँका/सआ-१/रत्नागिरी अर्बन को-ऑप बँक /क.१५६/अधि./२६/११२३.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये **रत्नागिरी अर्बन को-ऑप बँक लि. रत्नागिरी, जि. रत्नागिरी** या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यत शक्ती प्रदान करीत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र (जिल्हे) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नानासाहेब दाजी तुपे | सर व्यवस्थापक | वसुली अधिकारी | रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्हे. |

**अटी :-**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांना सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्त झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(७) **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " **वसुली अधिकारी रत्नागिरी अर्बन को-ऑप बँक लि. रत्नागिरी, जि. रत्नागिरी** " असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकाऱ्यांने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँकाकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ अन्वयेचे आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

(११) या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस, आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटीस बजावताना नोटीसमध्ये त्याचे नाव पदनाम भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

**नागनाथ यगलेवाड,**
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

पुणे,
दिनांक १ जून २०२६.

## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

### आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/महा. मंत्रालय बँक/का. क. १५६/२०२६/११०२.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑप. बँक लि., मुंबई या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रांसाठी कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नांव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. वैभव वसंत देसाई | शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, नाशिक, पुणे अहिल्यनगर, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव व सोलापूर. |
| २ | श्रीमती. शोभा जगदीश पागधरे | शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, नाशिक, पुणे अहिल्यनगर, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव व सोलापूर. |
| ३ | श्री. कल्पेश बाबूराव जाधव | सहाय्यक शाखा व्यवस्थापक | वसुली अधिकारी | मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, नाशिक, पुणे अहिल्यनगर, पालघर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव व सोलापूर. |

**अटी :-**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (१) मुंबई यांना सादर करावी.

(४) वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(७) **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " **वसुली अधिकारी, दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाईड ऑफिसेस को-ऑप. बँक लि., मुंबई** " असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँकाकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणताही रक्कम वसूल करता येणार नाही.

(११) या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसूल अधिकारी यांनी नोटीसा बजावताना नोटीसीमध्ये त्याचे नाव पदनाम भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

**नागनाथ यगलेवाड,**
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक २९ मे २०२६.

## सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

### आदेश

क्रमांक ना.बँका/१-सआ/मोगवीरा बँक/का.क.१५६/२०२६/१०५०.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, नागनाथ यगलेवाड, अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या आदेशान्वये **दि मोगवीरा को-ऑप. बँक लि. मुंबई** या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नांव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र (जिल्हे) |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. रेखा एस. अमिन | मॅनेजर | वसुली अधिकारी | मुंबई |
| २ | श्रीमती. वनाजक्षी कांचन | मॅनेजर | वसुली अधिकारी | रायगड |
| ३. | श्रीमती. नीता जी. करकेरा | मॅनेजर | वसुली अधिकारी | पालघर |
| ४ | श्रीमती. प्रकाशमाई पी. सॅलियन | मॅनेजर | वसुली अधिकारी | नाशिक |
| ५ | श्रीमती. सुधा मेंडन | मॅनेजर | वसुली अधिकारी | ठाणे |

**अटी :-**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम, १९६१ चा नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमाह विहित नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई-३ यांना सादर करावी.

(४) अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्त झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेल अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(७) **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही "महाराष्ट्र शासन नियुक्त" आणि किंवा "सिव्हील कोर्ट" "एक्झीक्युटीव्ह कोर्ट" या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये)" असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " **वसुली अधिकारी, दि मोगवीरा को-ऑप. बँक लि. मुंबई** " असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकाऱ्यांने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या / जामीनदाराच्या पगार कपाती बाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँकाकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार / जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ अन्वयेचे आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूलकरता येणार नाही.

(११) या कार्यालयाचे दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सूचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाच मध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस, आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या आदेशाचा संदर्भ नमूद करावा. वसुली अधिकारी यांनी नोटीस बजावताना नोटीसमध्ये त्याचे नाव पदनाम भ्रमणदूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

**नागनाथ यगलेवाड,**
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे,
दिनांक २६ मे २०२६.

## नागरी नेमणुका

**विभाग प्रमुख आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणुका, शक्ती आणि त्यांच्या इतर वैयक्तिक बाबी यासंबंधीचे आदेश शासनाकडून राजपत्राच्या या भागात अधिसूचनांच्या स्वरूपात प्रकाशित केले जातात ; त्यामुळे वरील बाबीसंबंधी सर्व संदर्भ निकालात निघाले आहेत असे समजण्यात यावे. अशा अधिसूचनांमुळे त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यमुक्ती व तत्सम बाबी यासंबंधी आनुषंगिक आदेश काढणे आवश्यक असल्यास राजपत्र मिळाल्यानंतर त्यांनीच ते काढले पाहिजेत. कारण शासनाकडून इतर कोणतेही आदेश काढले जाणार नाहीत.**

## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १८ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एईओ-१०२६/प्र.क्र.२१८/२०२६/भाप्रसे-१.—श्री. रघुनाथ खंडू गावडे, भा.प्र.से. (एस. सी. एस.-२०११), अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई, हे दिनांक ३१/०५/२०२६ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुष्का दळवी,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 18th June 2026.

*NOTIFICATION*

No. AEO-1026/C.R.218/2026/IAS-1.—Shri. Raghunath Khandu Gawade, IAS (SCS-2011), Additional Controller of Stamps, Mumbai on attaining the age of superannuation, is retired from Government service *w.e.f.* 31/05/2026 [A.N.].

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUSHKA DALVI,
Under Secretary to Government.

## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १८ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एईओ-१०२६/प्र.क्र.२१६/२०२६/भाप्रसे-१.—श्रीमती विमला आर., भा.प्र.से. (एस. सी. एस. २००९), निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली ह्या दिनांक ३१ मे २०२६ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुष्का दळवी,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 18th June 2026.

*NOTIFICATION*

No. AEO-1026/C.R.216/2026/IAS-1.—Smt. Vimala R., IAS (SCS - 2009), Resident Commissioner and Secretary, Maharashtra Sadan, New Delhi, on attaining the age of superannuation, is retired from Government service *w.e.f.* 31/05/2026 [A.N.].

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUSHKA DALVI,
Under Secretary to Government.

## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १२ जून २०२६

### अधिसूचना

क्रमांक एईओ-१०२६/प्र.क्र.२१९/२०२६/भाप्रसे-१.—श्री. अजीज करीम शेख, भा.प्र.से. (Non-SCS-२०१९), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे हे दिनांक ३१/०५/२०२६ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुष्का दळवी,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 12th June 2026.

*NOTIFICATION*

No. AEO-1026/C.R.219/2026/IAS-1.—Shri. Aziz Karim Shaikh, IAS (Non - SCS - 2019), Chief Executive Officer, Zilla Parishad, Dhule, on attaining the age of superannuation is retired from Government service *w.e.f.* 31/05/2026 [A.N.].

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUSHKA DALVI,
Under Secretary to Government.

## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ०९ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एईओ-१०२६/प्र.क्र.२१५/२०२६/भाप्रसे-१.—श्री. अनिल उध्दवराव डिग्गीकर, भा.प्र.से. (आर. आर. - १९९०), अपर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे दिनांक ३१/०५/२०२६ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुष्का दळवी,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 09th June 2026.

*NOTIFICATION*

No. AEO-1026/C.R.215/2026/IAS-1.—Shri. Anil Udhavrao Diggikar, IAS (RR-1990), Additional Chief Secretary, Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Mantralaya, Mumbai, on attaining the age of superannuation is retired from Government service *w.e.f.* 31/05/2026 [A.N.].

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUSHKA DALVI,
Under Secretary to Government.

## सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ०९ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एईओ-१०२६/प्र.क्र.२१७/२०२६/भाप्रसे-१.—डॉ. योगेश पाटीलबा म्हसे, भा.प्र.से. (एस. सी. एस.- २००९), सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई हे दिनांक ३१/०५/२०२६ (मध्यान्होत्तर) रोजी शासनाच्या सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनुष्का दळवी,**
शासनाचे अवर सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated 09th June 2026.

*NOTIFICATION*

No. AEO-1026/C.R.217/2026/IAS-1.—Dr. Yogesh Patilba Mhase, IAS (SCS -2009), Secretary, Minority Development Department, Mantralaya, Mumbai on attaining the age of superannuation is retired from Government service *w.e.f.* 31/05/2026 [A.N.].

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANUSHKA DALVI,
Under Secretary to Government.

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मे, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेवानि-२०२६/प्र.क्र.१२९/उद्योग-३.—श्री. रमेश मा. सुतार, उद्योग उपसंचालक (प्रशासन), उद्योग संचालनालय, मुंबई हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ मे, २०२६ (म.नं.) रोजी पासून शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शशांक चव्हाण,**
कार्यासन अधिकारी.

---

## गृह विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एमव्हिडी-०७२३/प्र.क्र.२५२/परि-४.—श्री. संजय चंद्रकांत डोळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर हे दि. ३०.०९.२०२१ रोजी शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. बा. आपटे,**
शासनाचे अवर सचिव.

---

## गृह विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक. H. D.-२६०१७/३६६/२०२६-HDO२, (E-१५९७२९६).—श्री. जयदीप गोविंदराव कामत, वरिष्ठ स्वीय सहायक गृह विभाग हे दि.३०.०६.२०२६ (म.नं.) पासून शासकीय सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मु. नि. धुरी,**
शासनाचे सह सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.